# दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान
# शहर उपजीविका केंद्र

**संकल्पना :-**

सारांश :

अनौपचारिक क्षेत्र हे शहरातील मध्यम व उच्च उत्पन्न गटाला सुरक्षा , सुतारकाम, बागकाम , बांधकाम , नळ, विद्युत काम , आरोग्य समर्थन, घरगुती कामांसाठी, रोजगार उपलब्धता माहिती. इ. विविध सेवा देणारे साधन आहे. पण या सेवा शहरी भागात संघटित आणि विश्वसनीय पद्धतीने उपलब्ध नाहीत. अभियानाच्या कार्यक्षेत्रामध्ये सदर सेवा एका छत्राखाली देण्यासाठी शहर उपजीविका केंद्र संकल्पना साकारली आहे.

**शहर उपजीविका केंद्राचा उद्देश :-**

दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानातील शहरे खालील प्रमाणे काही कमतरता भरून काढून एक मंच तयार करतील जिथे:

- शहरी गरीब त्यांच्या सेवा आणि वस्तू संघटित आणि विश्वसनीय पद्धतीने उपलब्ध करून देऊ शकतील. उपजीविका केंद्र हे शहरी गरीब उत्पादक व ग्राहक यांना जोडणारा दुवा असेल तसेच वस्तू व सेवा यांची मागणी व पुरवठा जोडण्याचे काम करेल.
- शहरी गरिबांना माहिती आणि व्यवसायासंबंधी आवश्यक सहाय्य सेवा मिळतील

**स्थापना व निधी :**

CLC खालील नियमानुसार स्थापन केले जाऊ शकते :

- जिल्हा मुख्यालय १ लाख पेक्षा कमी लोकसंख्या / वैधानिक शहरे - १ CLC
- १-३ लाख लोकसंख्या शहर - १ CLC
- ३-५ लाख लोकसंख्या शहर - २ CLC
- ५-१० लाख लोकसंख्या शहर - ३ CLC
- लोकसंख्या १० लाखांहून अधिक शहर - ८

**प्रस्ताव** :

शहर उपजीविका केंद्र स्थापन करणेसाठी नागरी स्थानिक संस्थेने विहित नमुन्यामध्ये प्रस्ताव तयार करणे गरजेचे आहे. प्रस्तावासोबत उपजीविका केंद्रासाठी देण्यात आलेली जागा/ इमारत बाबतचे

ठराव , जागा इतर कोणाची असेल तर ( स्वतःची/ भाडेकरारावर) नाहरकत प्रमाणपत्र जोडून प्रस्ताव राज्य अभियान व्यवस्थापन कक्षा कडे मंजुरीसाठी पाठवणे बंधनकारक आहे.

**पायाभूत सुविधा :**

आवश्यक संसाधने उदा. , खुर्च्या, संगणक, फोन, टेबल, कपाटे इ CLC मध्ये उपलब्ध करून देण्यात यावेत. तसेच CLC स्थापनेसाठी जागा १,००० चौ. फूट, दोन खोल्या आणि एक वॉश रूम असणे आवश्यक आहे.

**नोंदणी** :

CLCs संस्था अधिनियम नोंदणी अंतर्गत नोंदणीकृत केले जाऊ शकते .CMMU किंवा इतर संघटना, एनजीओ, यांच्याकडे शहर पातळीवर CLCs नोंदणी जबाबदारी असेल.

**बँक खाते:**

CLC च्या नावाने एक वेगळे बँक खाते उघडले पाहिजे ते संयुक्तपणे चालविले जाईल (नागरी स्थानिक संस्था/ इतर संघटना/ एनजीओ/ व्यवस्थापक प्रतिनिधी व CLC सदस्य) CLC मध्ये आवश्यक सर्व लेखा पुस्तके उदा., सदस्यत्व तपशील भाग भांडवल, व्यवसाय व्यवहारांची इ सर्व आवश्यक पुस्तके, CLC पातळीवर योग्यपद्धतीने अद्यावत ठेवली पाहिजे

**कर्मचारी भरती :**

सुरुवातीला १-२ व्यक्तीची CLC मध्ये नियुक्ती केली जाऊ शकते. जर कोणत्याही एजन्सी कडे (सीएसओ संघटना / एजन्सी ) CLC व्यवस्थापकीय जबाबदारी देण्यात आली आहे तर एजन्सीने आवश्यक कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक आहे.

**खर्चाचे स्वरूप :**

MHSULM कडून वितरीत करण्यात आलेला निधी खालीलप्रमाणे वापरण्यात येणे आवश्यक आहे.

- टेबल, खुर्ची, इतर कार्यालयीन साहित्य, संगणक आणि उपकरणे खरेदी, वीज , दूरसंचार, पाणी पुरवठा.
- मासिक चालू खर्च, बैठक खर्च इ

- उपजीविका केंद्राच्या प्रचार प्रसाराचे साहित्य व CLC च्या सेवा सुविधांचा प्रचार प्रसार करणे
- CLC मार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवा सुविधांविषयी माहिती संकलन करणे.
- नोंदणी आणि CLC बँक खाते उघडणे
- बँक जोडनि बाबतच्या सेवा व शहर फेरीवाल्यांचा विकास.
- उद्योजकाचे कौशल्य आणि विकास प्रशिक्षण

**उपजीविका केंद्रासाठीचा निधी :**

CLCs साठी MHSULM कडून वितरीत करण्यात आलेला निधी कोणतेही बांधकाम किंवा भौतिक सुविधा नूतनीकरणासाठी वापरता येणार नाही. प्रत्येक CLC ला १० लाख रुपये इतका निधी देण्यात येईल. हा निधी खालील टप्यानुसार ३ हप्त्यांमध्ये दिला जाईल.

**हप्ते:**

MHSULM कडून नागरी स्थानिक संस्थेस खालील टक्केवारीनुसार देण्यात येईल.

१. ३०% निधी CLC प्रस्तावास SULM कडून मंजुरी मिळाल्यानंतर एका आठवड्यात
२. ४० % निधी कृती आराखड्यानुसार कर्मचारी नियुक्ती झाल्यानंतर
३. ३० % निधी CLC सुरु होऊन सेवा देण्यास सुरुवात झाल्यावर.

**उपजीविका केंद्राच्या सेवा:**

शहरी गरिबांना माहिती आणि आवश्यक ती मदत देण्यात येईल

१. लाभार्थी तसेच इतर व्यक्तींचे बँक खाते उघडणे
२. विविध प्रशिक्षण , रोजगार माहिती, विविध शासकीय योजनांतर्गतच्या संधी व माहिती
३. सामाजिक विकास योजनांची माहिती
४. UID / आधार कार्ड इ नोंदणी.
५. वस्तू आणि उत्पादन नोंदणी माहिती,
६. शहरी गरीब सेवेचे विपणन.

CLC च्या माध्यमातून स्वत:च्या सेवा/ वस्तू पुरवू इच्छितात त्यांच्यासाठी CLC नोंदणी फी आकारू शकते. प्रत्येक वर्षी नोंदणी शुल्क भरून नोंदणीचे नूतनीकरण केले जाऊ शकते. नोंदणी आणि नूतनीकरण शुल्क हे शहरी भागातील गरीबांशी चर्चा सल्लामसलत करून नागरी स्थानिक संस्थेकडून निश्चित केले जाईल.

**शुल्क आधारित सेवा:**

शहरी गरिबांसाठी नाममात्र शुल्क आकारून CLC काही सेवा देऊ शकते. या प्रत्येक सेवेबाबतचे नाममात्र शुल्क ULB कडून निश्चित केले जाईल. अश्या सशुल्क सेवांची यादी व त्यासाठी द्यावे लागणारे शुल्क याचा तपशील CLC मध्ये लावला जाईल. या सेवांची सूचक यादी खालीलप्रमाणे

१. बाजारपेठेतील मागणी व बाजार धोरण वर माहिती शहरी गरीब :जे लहान व्यवसाय करतात त्यांना, बाजार गरजा, त्यांच्या उत्पादन उत्पादने यांना असणारी मागणी , दर, विक्री कोठे करावी इ. बाबत चांगल्या प्रकारे समर्थन दिले जाऊ शकते
२. शहरी गरिबांकडून उत्पादित मालाचे विपणन व त्या आधारित इतर सेवा. उत्पादन विकास सेवा.
३. नोंदणी, परवाना, लेखा व लघुउद्योग कायदेशीर सेवा :CLCs लघुउद्योग नोंदणी सुविधा आणि लघुउद्योग चालू साठी आवश्यक परवाने, लेखा व इतर कायदेशीर सेवा पुरवू शकते
४. रोजगार उपलब्धता बाबत सेवा :CLC योग्य रोजगार क्षेत्रात उद्योग आणि त्यांच्या संघटनेशी संबंध जोडून योग्य कौशल्य असलेले शहरी गरीब शोधून रोजगाराची उपलब्धता बाबत विविध सेवा पुरवू शकते.

**इतर सेवा:**

**CLCs देखील इतर सेवा देऊ शकतात. या सेवा सूचक यादी खालीलप्रमाणे:**

१. विविध स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये नळ, वीज, वीज बिले, मालमत्ता देयके देणे इत्यादी बाबतीत सेवा पुरवू शकते. इतर करारीत सेवा (स्वच्छता सुविधा, कॅन्टीन सुविधा, स्टेशनरी पुरवठा,) पुरवू शकते.

२. CLC उद्योग / कंपन्या, उद्योग संघटना यांना फी आकारून मागणी व अवश्यकतेनुसार प्रशिक्षित मनुष्यबळ पुरवू शकते उदा. सफाई, वीज, मदतनीस, मूलभूत घरगुती कामांसाठी कर्मचारी किंवा डाटा एंट्री ऑपरेटर, साठी मॉल किंवा रिटेल आऊटलेट्स मध्ये कर्मचारी पुरवठा अशा सेवा पुरवू शकते.

३. प्रशिक्षण ठिकाण: पुरेशी जागा आणि पायाभूत सुविधा CLC मध्ये उपलब्ध असल्यास प्रशिक्षण केंद्र म्हणून जागा उपलब्ध केली जाऊ शकते.

४. पाळणाघर सेवा: नोकरी व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी आवश्यक पाळणा घराची सोय CLC करू शकते.

५. CLC परिसरात नागरिकांना UID / आधार कार्ड काढण्याच्या सेवाही उपलब्ध करू शकते, तसेच शासनाच्या सेतु सुविधा केंद्रातील सेवा उपलब्ध करू शकते.

६. विविध सरकारी विभाग, बँका, विमा संस्था आणि इतर संस्थानां शहरी गरीबांशी संवाद सुविधा प्रदान करू शकते, त्याच्या सेवा पुरवू शकते.

वरील यादी केवळ सुचक आहेत. ULB (सशुल्क / इतर) स्थानिक गरजा लक्षात घेऊन आणि योग्य त्या सल्ला मसलतीनंतर वेगवेगळ्या सेवा सुविधा उपलब्ध करून देऊ शकते.

**शहर उपजीविका केंद्र ( CLC )**

**कृती आराखडा**

शहरी गरिब त्यांच्या सेवा व वस्तू संघटित आणि विश्वसनीय पद्धतीने उपलब्ध करून देऊ शकतील यासाठी राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान राबवणारी शहरे शहर उपजीविका केंद्र ( CLC ), स्थापन करतील. NULM संचालन मार्गदर्शक तत्वानुसार CLC चे कामकाज चालेल

**कृती आराखडा**

| अ.क्र. | कृती | नियोजित वेळ | प्रगती | समस्या |
|---|---|---|---|---|
| १ | उपजीविका केंद्राची संकल्पना स्पष्ट करणे /मार्गदर्शन घेणे. | | | |
| २ | उपजीविका केंद्रासाठी जागा व्यवस्था १००० चौ फुट २ खोल्या आणि १ वॉशरूम सह क्षेत्र (मालकीची किंवा भाड्याने). | | | |
| ३ | व्यवसाय व्यवहार्यते सहित उपजीविका केंद्राचा प्रस्ताव | | | |
| ४ | मूल्यांकन, मान्यता आणि MHSULM कडे CLC प्रस्ताव अग्रेषित करीत आहे | | | |
| ५ | उपजीविका केंद्राची नोंदणी | | | |
| ६ | उपजीविका केंद्राचे बँक खाते उघडणे | | | |
| ७ | CLC प्रस्ताव मंजुरीस एक आठवडा झाल्यावर MHSULMM कडून निधीचा पहिला हप्ता देण्यासाठी विनंती | | | |
| ८ | CLC ची कार्यप्रणाली ठरवणे /ALF किंवा CLF द्वारे चालवणे किंवा स्वतः ULB | | | |

| अ.क्र. | कृती | नियोजित वेळ | प्रगती | समस्या |
|---|---|---|---|---|
| | कडून चालवणे की /PPCP मोड मध्ये इतर संस्थांद्वारा चालविणे जबाबदारी कोणाकडे | | | |
| ९ | गरजेनुसार सेवा तयार करणे . | | | |
| १० | आवश्यक मूलभूत सुविधांची यादी करणे उदा. खुर्ची, टेबल, दूरध्वनी, कपाटे इ. | | | |
| ११ | गरजेनुसार सुयोग्य कर्मचारी नेमणूक/ | | | |
| १२ | CLC कर्मचारी नियुक्ती नंतर SULM कडून निधीच्या दुसऱ्या हप्त्याची मागणी. | | | |
| १३ | CLC कामकाजासाठी प्रचार व प्रसार साहित्य तयार करणे | | | |
| १४ | CLC ची सुयोग्य जाहिरात | | | |
| १५ | CLC मध्ये लाभार्थ्यांची नोंदणी | | | |
| १६ | CLC कामकाजाची प्रत्यक्ष सुरवात | | | |
| १७ | CLC करिता निधीच्या तिसऱ्या हप्त्याची मागणी. | | | |
| १८ | सादर व्यवसाय मॉडेल नुसार CLC कार्यरत करणे | | | |
| १९ | स्थानिक गरजा आणि CLC चा उद्देश विचारात घेऊन व्यवसाय स्वरुपात किंवा CLC सेवा, शुल्क या संरचनेमध्ये आवश्यक तो बदल करणे | | | |

Deendayal Antyoday Yojana National Urban Livelihoods Mission
Directorate of Municipal Administration
Annexure VII: Proposal Details for Establishment of CLCs
The proposal submitted by ULB to SULM should have the following details
(Please confirm that ULB has attached things as per below checklist)

Name of the ULB :

Date of proposal Submitted to DMA :

| Sr.no. | Proposal Details | Yes / No | Remarks |
|---|---|---|---|
| 1 | Name of the Municipality & Detail Address | | |
| 2 | Total wards in the municipality | | |
| 3 | Total slums in the municipality | | |
| | A) Official | | |
| | B) Not specified | | |
| 4 | Name (s) of the ward(s) covered by CLC | | |
| 5 | Total population of city | | |
| 6 | Total population in the area | | |
| 7 | Total Urban poor covered in the area | | |
| 8 | Potential no. of members expected to be covered by CLC | | |
| 9 | Action plan for establishment of CLC | | |

| Sr.no. | Proposal Details | Yes / No | Remarks |
|---|---|---|---|
| 10 | Major services possible through CLC in the area | | |
| 11 | Scope for growth of CLC services in the area | | |
| 12 | Details of the premises given for CLC by ULB | | |
| | A) Area (1000 Sq.Feet with 2 rooms & washroom) | | |
| | B) Location | | |
| | C) Is the location is nearby to ULB office? (Yes/No) | | |
| | D) Resolution of premises | | |
| 13 | Plan for facilitation of CLC – Resource agency/ CBO | | |
| 14 | Operation and Management by (Responsibility By) | | |
| 15 | Proposal Prepared by | | |
| 16 | Proposal assessed by | | |
| 17 | Name and designation of the forwarding authority | | |
| 18 | Business Plan of CLC – to include break-even and viability | | |